सन २०१९-२० आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृह, नवी मुंबई बांधकामाच्या भुमिसंपादनाकरीता निधी वितरण. लेखाशीर्ष (४२२५ ०१३१)

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/ प्र.क्र. ५६ /कार्यासन.६

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: ०२ ऑगस्ट, २०१९

वाचा

१) शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.०१.०४.२०१९

२) शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.८.०७.२०१९.

३) शासन ज्ञापन क्र. आविवि, क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.२७/का-६ दि.३०/०३/२०१९

४) अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांचा प्रस्ताव जा.क्र.शावगृ-२०१९/प्र.क्र. /का.७(२) / ३०४७ दि.२५/०६/२०१९

५) नस्ती क्र. आवगृ१३१९/प्र.क्र.११२/का-०५.

**शासन निर्णय-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षात मागणी क्रमांक टी-६ मुख्य लेखाशिर्ष ४२२५ , अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ०२ अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना अंतर्गत, (०१) (०४) भुमिसंपादन (कार्यक्रम) (४२२५ ०१३१), ५३- मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली रु.१२००.०० लाख इतकी तरतुद अर्थसंकल्पीत आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत नवी मुंबई येथील आदिवासी मुलांचे वसतीगृहासाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित.(CIDCO) यांचे कडून कोपरखैरणे सेक्टर ३ येथील भुखंड क्र.१६, क्षेत्रफळ १४७७.११ चौ.मी. भाडेपट्टा करारनाम्याने देण्यास मान्यता दर्शविण्यात आली आहे. या भाडे पट्टा + वस्तू व सेवा करापोटी (GST) ची उर्वरीत रक्कम शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित.(CIDCO) यांना अदा करण्याच्या अनुषंगाने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-६, (०१) (०४) भुमिसंपादन (कार्यक्रम) (४२२५ ०१३१), ५३- मोठी बांधकामे

या लेखाशीर्षाखाली रु.९,६१,७७८ एवढा निधी नियंत्रक अधिकारी, अपर आयुक्त , आदिवासी विकास **ठाणे** यांना (BEAMS) अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली वर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | भाडे पट्टा करारनाम्यापोटी अनुज्ञेय रक्कम | संकीर्ण बाबी | एकुण आवश्यक रक्कम | यापुर्वी अदा केलेली रक्कम | सदर शा.नि.द्वारे वितरीत करण्यात येणारी उर्वरीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १,३९,७१,८०७/- | ४,६५,५७५/- | १,४४,३७,३८२/- | १,३४,७५,६०४/- | ९,६१,७७८/- |

२. सदर निधीचे वितरण खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

1) वितरीत करण्यात आलेला निधी माहे ३१ मार्च, २०२० अखेर खर्च करण्याची दक्षता घेण्यात यावी.

2) सदर वितरीत निधीमधुन झालेला खर्चाचा अहवाल नियंत्रक अधिकारी यांनी एकत्रित करुन तो आयुक्त, आदिवासी विकास व शासनास सादर करावा.

3) वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रकामधील विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील.

३. सदर शासन निर्णय संदर्भ क्र. १ व २ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३१११२६५५५७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf728255a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2019.08.02 15:44:35 +05'30'

**(किरण कि.पवार)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खासगी सचिव , मंत्रालय, मुंबई..

२. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, मंत्रालय, मुंबई.

६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.

७. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र, पेण, जि.रायगड.

८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड

१०.वित्त विभाग (व्यय १४/अर्थ-१९), मंत्रालय, मुंबई-३२

११.निवड नस्ती (का-६) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.